तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/ ८८८
दिनांक : - 3 AUG 2017

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
नागपूर

विषय :- थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता रिक्त जागांबाबत
संदर्भ : आपल्या कार्यालयाचे पत्र क्रमांक तंशिवि / प्राकाना/शेवि/PH/२०१७/२१५८दिनांक ३१.७.२०१७

वरील विषयाबाबत व संदर्भाधीन पत्रान्वये औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या व पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी ई मेल द्वारे केलेली विनंती पुढील कार्यवाहीसाठी संचालनालयाकडे पाठविण्यात आलेली आहे. याबाबत कळविण्यात येते की, थेट द्वितीय वर्षासाठी रिक्त जागांची गणना कशी करावी याबाबत संचालनालयाने २अ/एडीएम/२०१७/८१५, दिनांक १८.७.२०१७ अन्वये निर्देश सहसंचालकांमार्फत सर्व संस्थांना देण्यात आलेले आहेत. सदर पत्रात नमूद थेट द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांच्या गणनेबाबत मा.उच्च न्यायालय,मुंबई , खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्रमांक ९१६०/२०१७ ,८९५९/२०१७,९००३/२०१७ येथे दाखल झाल्या असता सदर गणनेची पध्दती शासनाने असाधारण राजपत्रान्वये निर्धारीत केलेल्या प्रवेश नियमानुसार करण्यात आलेली असून वर्गखोल्यांची कमाल बैठक क्षमता विचारात घेऊन त्यासंबंधीचे सूत्र दिनांक १८.७.२०१७ च्या पत्रानुसार निश्चित केलेले असून ते मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्रमांक ९१६०/२०१७ ,८९५९/२०१७,९००३/२०१७ च्या अनुषंगाने संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/न्याप्र/२०१७/८३८, दिनांक २१.७.२०१७ अन्वये सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय ,औरंगाबाद यांचेमार्फत दाखल केलेले आहे. आणि अद्यापर्यंत सदर बाब तूर्तास न्यायप्रविष्ट आहे. सुपरन्यूमररी १०% ची मर्यादा ही औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासाठी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया ने घालून दिलेली असून ती देशभर एकसारखी असल्याने त्या मर्यादेवर फेरविचार केवळ PCI स्तरावर होऊ शकेल. त्यासंदर्भात संचालनालयाच्या स्तरावर निर्णय घेता येत नाही ,शिवाय सुपरन्यूमररी १०% जागा हया रिक्त जागाच्या गणना सूत्रामध्ये बेरीज करुन परिणामस्वरूप रिक्त जागा गणण्यात येत आहेत ही बाब संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपले निदर्शनास आणण्यात येत आहे.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

पृष्ठांकन क्र.-विकाअ/शिक्षण/२०१७/ 1870
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक
0 8 AUG 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :- १) प्राचार्य, सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था , अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की उपरोक्त परिपत्राकान्वये कार्यवाही करण्यात यावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.